# दुय्यम निबंधक कार्यालयातील कामकाज

# (FUNCTIONS IN SUB REGISTRAR OFFICE)

दुय्यम निबंधक कार्यालयांमधून नोंदणी अधिनियम,1908 अन्वये खालीलप्रमाणे कामकाज पार पाडले जाते -

- दस्तांची नोंदणी करणे
- नोंदणी केलेल्या दस्तांच्या प्रतिलिपी (Copy) तयार करुन जतन करणे व मागणीनुसार प्रमाणित नक्कल देणे.
- नोंदणी केलेल्या दस्तांच्या सूची (Index) तयार करणे व मागणीनुसार प्रमाणित नक्कल देणे.
- नोंदणी केलेल्या दस्तांच्या प्रती व सूची मागणीनुसार पाहणीसाठी व व्यवहारांचा शोध घेण्यासाठी (Inspection & Search ) उपलब्ध करुन देणे.
- नोंदणी केलेल्या स्थावर मिळकतीच्या हस्तांतरणाच्या दस्तांची माहिती, मिळकत अभिलेखात फेरफार घेण्यासाठी संबंधित यंत्रणकडे पाठविणे

सदर सर्व कामकाज संगणकीकृत दस्त नोदंणी प्रणालीच्या (Computerised Registration System) सहाय्याने पार पाडले जाते.